## निशाणी क्र.२० वरील आदेश
## (दि.३० ऑगस्ट २०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आज्ञा ०६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्याबाबत दिला आहे. सोबत स्वता:चे शपथपत्र देखील दाखल केलेले आहे. प्रतिवादींनी अर्जास कोणतीही हरकत घेतली नाही.

२) वादीने कथन केले की, त्याने मच्छिंद्र चिंचोली येथील गट क्र.३८९ मधील ४४ आर जमीनीपैकी उत्तर बाजुने केलेले २६ आर अतिक्रमणचा ताबा मिळण्याबाबत प्रतिवादींविरुध्द दावा दाखल केला आहे. त्या दाव्यामध्ये वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक करण्याबाबत अर्ज दिला होता व तो मंजुर झालेला आहे. दावा चालु असताना वादीने ४४ आर क्षेत्र दि.२२.०२.२०२१ रोजी स्वता:च्या पत्नीस वाटणीपत्राआधारे हस्तांतरीत केली आहे. त्याचा फेरफार क्र.४५६३ मंजुर झाला आहे. वादीचे नाव वगळुन त्या ठिकाणी सौ. कविता दिलीप मठपती यांचे वादी म्हणुन नाव समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सदर दुरुस्ती मंजुर झाल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होत नाही. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

३) अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, वादी दिलीप श्रीधर मठपती याने प्रतिवादींविरुध्द गट क्र.३८९ चे क्षेत्रफळ ४४ आर यावर प्रतिवादींनी अतिक्रमणीत केलेल्या २६ आर जमीनीचा ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. नि.क्र.१६ वरील ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यावर वादीचे नाव नमुद आहे. वादीने शपथेवर कथन केले की, दि.२२.०२.२०२१ रोजी त्याने त्याच्या पत्नीच्या नावे ००.४४ आर क्षेत्र हस्तांतरीत केलेले आहे.

४) नि.क्र.२१ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत गट क्र.३८९ च्या ७/१२ उतारा व फेरफार क्र.४५६३ ची प्रत दाखल केली आहे. सदर ७/१२ उता-यावर वादीचे नाव फेरफार

क्र.४५६३ नुसार कमी झाले व त्याच्या पत्नीचे नाव लागल्याचे दिसुन येत आहे. वादीने कथन केले की, त्याने वाटणीपत्राने त्याच्या पत्नीच्या नावे ००.४४ आर क्षेत्र हस्तांतरीत केले आहे. फेरफार क्र.४५६३ त्या बाबीस पुष्टी देतो.

५) मुळ दावा हा अतिक्रमणीत क्षेत्राचा ताबा मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे. दिवाणी प्रक्रिया १९०८ ची आज्ञा ०१ नियम १० (२) प्रमाणे वादीच्या पत्नीचे नाव वादी म्हणुन समाविष्ट करण्यास कोणतीही अडचण नाही. त्याच वेळेस वादीचे नाव दाव्यातुन वगळणे उचित ठरणार आहे. दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो,

**आदेश**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) वादीने मागणी प्रमाणे दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

३) अर्जाचा खर्च पक्षकारांनी ज्याचा त्याचा सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN BHAGVAT SHIRSATH
Date: 2022.08.30 16:15:08 +0530

(**स. भा. शिरसाठ**)

दिनांक ३०/०८/२०२२ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
घनसावंगी.